| महाराष्ट्र पोलीस | **पोलीस आयुक्तालय नवी मुंबई**<br>**प्रेसनोट** | 2025<br>CB/ 25/2025 |
|---|---|---|

**गुन्हे शाखा, नवी मुंबई** **दिनांक ०५.०५.२०२५**

**'' अवैध राहणारे २ पुरूष, ३ महिला बांगलादेशी नागरीकांवर गुन्हे शाखेची कारवाई ''**

---

श्री. मिलींद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री. संजय येनपुरे, पोलीस सह आयुक्त, श्री. दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. अमित काळे, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे) यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अवैधरित्या राहत असलेल्या बांगलादेशी नागरीकांवर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाच्या पोउपनिरी/सरिता गुडे यांना बातमी मिळाली की,''रुम नं ६०७, सहावा माळा, प्लॉट नंबर ९३, ब्ल्यु क्रिश सहकारी गृहनिर्माण सोसायटी, सेक्टर ०६, करंजाडे, पनवेल, जि.रायगड येथे काही बांगलादेशी नागरीक बेकायदेशीरपणे वास्तव्यास आहेत.

सदर बातमीच्या अनुषंगाने त्यांनी दिनांक ०४/०५/२०२५ रोजी सकाळी ०९.१६ वाजता पथकासह छापा टाकला असता, सदर ठिकाणी ०३ पुरुष व ०३ महिला मिळुन आले. त्यांच्याकडे चौकशी केली असता ते बांगलादेश मधुन व्हिजा व्दारे भारतात आले असल्याचे त्यांनी सांगितले. चौकशीमध्ये यातील आरोपी क्रमांक १, २ व ४ हे भारतात व्हिजा व्दारे आल्याचे व व्हिजा संपल्यानंतरही ते भारतात अवैधरित्या वास्तव्य करत असल्याचे आढळुन आले.

तसेच आरोपी क्र ३ व ५ हे घुसखोरीच्या मार्गाने भारत बांगलादेश सिमेवरील गस्ती पथकाची नजर चुकवुन व स्थानिक मुलकी अधिकाऱ्यांचे पुर्व परवानगीशिवाय व कोणत्याही वैध प्रवासी कागपत्रांशिवाय भारतात प्रवेश करून राहत असल्याचे निष्पन्न झाले. **त्यांच्याकडे बांगलादेशी पासपोर्ट असुनही त्यांनी भारतीय नागरीक असल्याबाबतचे आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदान कार्ड प्राप्त केल्याचे आढळुन आले.**

**तसेच यातील आरोपी क्र १,२ व ३ या तिघांनी भारतीय पासपोर्ट देखील प्राप्त केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यांनी गैरमार्गाने व फसवणुकीने प्राप्त केलेली सर्व भारतीय नागरीकत्वाचे पुरावे रद्द होण्यासाठी संबंधित विभागांना पत्रव्यवहार करण्यात येत आहे.**

आरोपी विरुध्द पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर २३१/२०२५ पारपत्र (भारतात प्रवेश) १९५० कलम ३(ए)सह ६(ए), व विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम १४(अ) सह बीएनएस कलम ३१८(४), ३३६(२), ३३६(३), ३३८, ३४०(२) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई करत आहे.

**अटक बांगलादेशी नागरीकांची नावे खालील प्रमाणे.**

१) आन्ना खातुन आकाश गाझी वय ३५ वर्षे, व्यवसाय- पार्लर,टेलरीग, सध्या राहणार रूम नं ६०७, ०६ माळा, प्लॉट नंबर ९३, ब्ल्यु क्रिश सहकारी गृहनिर्माण सोसायटी, सेक्टर ०६, करंजाडे, पनवेल, रायगड, मुळ मियाजानपुर, थाना-चौरफेशन, जिल्हा- भोला, बांगलादेश. सोबत ६ वर्षाची लहान मुलगी.

२) आलो खातुन इस्लाम गाझी, वय ३१ वर्षे, व्यवसाय गृहीणी, सध्या राहणार रुम नं ६०७, ०६ माळा, प्लॉट नंबर ९३, ब्ल्यु क्रिश सहकारी गृहनिर्माण सोसायटी, सेक्टर ०६, करंजाडे, पनवेल, रायगड. मुळ गाझीपुर थाना- बेनापुल, जिल्हा-जोशोर, बांगलादेश.

३) इस्त्राफिल इस्लाम गाझी, वय २५ वर्षे, धंदा बिगारी , सध्या राहणार रूम नं ६०७, ०६ माळा, प्लॉट नंबर ९३, ब्ल्यु क्रिश सहकारी गृहनिर्माण सोसायटी, सेक्टर ०६, करंजाडे, पनवेल, रायगड मुळ गाझीपुर थाना- बेनापुल, जिल्हा-जोशोर, बांगलादेश.

४) किया आकाश गाझी, वय- २१ वर्षे, शिक्षण, सध्या राहणार - रूम नं ५०४, ०५ माळा, प्लॉट नंबर ७०, ओम आरव्ह बिल्डींग, सेक्टर ०६, करंजाडे, पनवेल, रायगड, मुळ मियाजानपुर, थाना-चौरफेशन, जिल्हा- भोला, बांगलादेश.

५) आकाश लतीफ गाझी, वय- ४० वर्षे, रिक्षा चालक , सध्या राहणार - रुम नं ५०४, ०५ माळा, प्लॉट नंबर ७०, ओम आरव्ह बिल्डींग, सेक्टर ०६, करंजाडे, पनवेल, रायगड, मुळ मियाजानपुर, थाना-चौरफेशन, जिल्हा- भोला, बांगलादेश
६) मोहम्मद इस्माईल अमिन्नोदीन येरुलकर, वय ५२ वर्ष,धंदा- रिटार्यर्ड,सध्या राहणार रुम नं ६०७, ०६ माळा, प्लॉट नंबर ९३, ब्ल्यु क्रिश सहकारी गृहनिर्माण सोसायटी, सेक्टर ०६, करंजाडे, पनवेल, रायगड,

आरोपी क्र ६ याने नमुद बांगलादेशी नागरीकांना भारतीय कागदपत्र बनवण्याकरीता व भारतात वास्तव्य करण्याकरीता मदत केल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आल्यामुळे त्याला सह आरोपी करण्यात आले आहे.

**वरील पाच ही आरोपी यांना दिनांक ०४/०५/२०२५ रोजी १४.०० वाजता अटक करुन दिनांक ०५/०५/२०२५ रोजी मा. कोर्टात हजर केले असता मा. कोर्टाने आरोपी यांना दिनांक ०९/०५/२०२५ रोजी पर्यत पोलीस कस्टडी मंजुर केलेली आहे.**

सदर कारवाई अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा श्री. अमित काळे, सहा पोलीस आयुक्त, अजयकुमार लांडगे, गुन्हे शाखा, नवी मुंबई व सहा. पोलीस आयुक्त, धर्मपाल बनसोडे, AHTU, गुन्हे शाखा, वपोनि/ पृथ्वीराज घोरपडे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस पथकामध्ये पोउपनि/सरिता गुडे, पोहवा/मांडोळे, पोशि/चव्हाण, पोशि/ठाकुर, पोशि/कोलते, मपोहवा/धोणसेकर, मपोहवा/ म्हात्रे, मपोहवा/ अडकमोल, चालक पोहवा/हांडे हे सहभागी होते.

**नवी मुंबई आयुक्तालयामार्फत जनतेला आवाहन करण्यात येते आहे की, '' बांगलादेशी नागरीक यांना पडताळणी न करता घर भाडयाने दिल्यास, कामासाठी ठेवल्यास संबधीत घरमालक, बांधकाम व इतर व्यावसाईक आणि अवैध परदेशी नागरीकांना मदत करणारे इतर व्यक्ती यांच्यावर परकीय नागरीक कायदा कलम १४ ( क ) तसेच रजिस्ट्रेशन ऑफ फॉरेनर्स ॲक्ट १९३९ कलम ५ अन्वये कारवाई करण्यात येवुन त्यांना सहआरोपी करण्यात येणार आहे.''**

★★★★★★★★★★